| MHYA160002662023 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०/२०२६**<br>**मनिष मधुकरराव घाटे + ३ वि.**<br>**कोणी नाही** |
|---|---|

**निशाणी क्र.१ खालील आदेश**

**दिनांक १३/०४/२०२६**

अर्जदारांनी हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ ची आई नामे पुष्पा मधुकरराव घाटे हया दिनांक ०६.११.२०२५ रोजी व अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे मधुकर शामराव घाटे हे दिनांक १६.१२.२०१८ रोजी मौजा गणोरी, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ येथे मयत झाले आहेत. पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे हे दोघे मौजा गणोरी, ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील रहिवासी होते. पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांच्या मृत्यूनंतर अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसा दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेत आला आहे.

०३. अर्जदारांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथने विचारात घेतल्यानंतर माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत मी त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणमिंमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार हे त्यांच्या मागणी प्रमाणे बॉम्बे रेग्सुलेशन अक्ट VIII १८२७ चे कलम ८ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | ... होय. |
| ०२. | कोणता आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ –</u>**

०४. पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे हे दोघे मयत झाल्याबाबत निशाणी ३/१ व ३/३ वर मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यावरुन हे सिध्द होते की, पुष्पा मधुकरराव घाटे हया दि. ०६.११.२०२५ रोजी व मधुकर शामराव घाटे हे दिनांक १६.१२.२०१८ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या व्यतिरिक्त मयत पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांना कोणीही वारस नाहीत. या संदर्भात दैनिक "मातृभूमी" या वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस काढून देखील कोणीही आक्षेप घेतलेला नाही. अर्जदारांनी निशाणी ०८ कडे अर्जदार क्र. १ मनिष मधुकरराव घाटे यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करून अर्जातील कथनांचा पुनरूच्चार केला आहे. सदर कथने विना आव्हानीत राहिली आहेत. निशाणी क्र. ३/१ व ३/३ कडे पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांचे मयताचे दाखले, ३/२ वर मौजे सरुळ ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील पोलीस पाटलांचा वारसाचा दाखला, ते ३/४ ते ३/७ कडे अर्जदारांच्या आधारकार्डांची प्रमाणीत प्रती दाखल केली आहे. दाखल पुराव्यावरुन हे सिध्द होते की, अर्जदार हे मयत पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांचे वारस आहेत.

०५. अर्जदार हे पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे असल्याने व त्याबाबत कोणाचाही आक्षेप नसल्याने अर्जदारांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्जदारांचे नावे ते मयत पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांचे वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्र देता येईल. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होय असे देतो.

**<u>मुद्दा क्रमांक २ –</u>**

०६. अर्जदार यांनी अर्ज सिध्द केलेला असल्यामुळे अर्ज मंजुर करणे योग्य आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक २ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार क्र. १ मनिष मधुकरराव घाटे, अर्जदार क्र. २. सतिश मधुकरराव घाटे, अर्जदार क्र. ३ किरण मधुकरराव घाटे व अर्जदार क्र. ४ माधुरी हेमंत कोंबे हे मयत पुष्पा मधुकरराव घाटे व मधुकर शामराव घाटे यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषीत करण्यात येत आहे.

०३. अर्जदारांच्या नावे आवश्यक असणारा मुद्रांक शुल्क घेवून वारसा दाखला देण्यात यावा.

०४. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.04.13 16:20:43 +0530

ठिकाण :– बाभुळगांव.
दिनांक :– १३/०४/२०२६.

(एच. एस. सातपुते)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बाभुळगांव.